**निशाणी क्र. ३३**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १० (PW–10) यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करते की,

नाव – नितेश संतोष गणगे,

वय – ३२ वर्षे, व्यवसाय – होमगार्ड,

राहणार – खैरा, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा

– – – – –

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत**

१. चार – पाच वर्षापासून मी होमगार्ड या पदावर कार्यरत आहे. दिनांक २८/०५/२०२१ रोजी माझी ड्युटी नांदुरा पोलीस ठाण्यात होती. त्यादिवशी सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी मला सांगितले की, नारायणपूर येथे जायचे आहे. नारायणपूर येथे गेलो, त्या ठिकाणी एक महिला होती तिचा खून झालेला होता. ती पडलेली होती. पोलीस पाटील आणि आत्माराम खैरे तेथे होते. चार लहान मुलेही तेथे होती. ती महिला मृत अवस्थेत होती. तिच्या अंगावर जखमा होत्या. इंगळे साहेबांनी तेथे एक महिला आणि एक पुरुष बोलाविला होता. त्यांनी तेथे पंचनामा केला. मी त्याच ठिकाणी उभा होतो. माझे बयान नाईकनवरे साहेबांनी नोंदविले होते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपासणी आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत**

२. हे खरे नाही की आज रोजी मी बयान वाचले आहे. मी जे पाहिले ते सांगितले. माझे बयान मला पोलीसांनी कधीच वाचून दाखविले नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले नव्हते की दिनांक २९/०५/२०२१ रोजी

नारायणपूर येथे मला चलण्यास सांगितले. आता मला वाचून दाखविण्यात आलेला माझ्या पोलीस जबाबातील अधोरेखीत भाग 'अ' हा खरा नाही. दिनांक २८/०५/२०२१ रोजी नारायणपूर येथे मी गेलो नाही, याविषयी माझे काही म्हणणे नाही. हे खरे आहे की दिनांक २८/०५/२०२१ रोजी मी नारायणपूर येथे गेलो नाही, त्यामुळे मला त्याविषयी काही माहिती नाही. हे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.01 18:07:13 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०४/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत दुपारी १५.१० वाजता सुरु करुन दुपारी १५.२२ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.01 18:07:17 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०४/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |